**सन २०१७ ते २०१९ या ३ वर्षांच्या कालावधीमध्ये ५० कोटी वृक्ष लागवड, संगोपन आणि देखभाल या कार्यक्रमांतर्गत दिलेल्या उद्दिष्टासंदर्भात वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करण्याबाबत.**
**सन २०१८ मधील नियोजित १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत नियोजन व पुर्वतयारीबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :-वृक्षला-२०१६/प्र.क्र.१६४/का-१४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ नोव्हेंबर, २०१७.

**वाचा** :- १. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: सावावि-२०१५ / प्र.क्र.१३१/ फ-११,दि. ३१.०३.२०१६.
२. शासन परिपत्रक आदिवासी विकास विभाग, क्रमांक-वृक्षला २०१६/प्र.क्र.३९/ का-१४, दि.२०.०४.२०१६
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: सावावि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दि. १०.१०.२०१६
४. शासन परिपत्रक आदिवासी विकास विभाग, क्रमांक-वृक्षला २०१६/प्र.क्र.१६४/ का-१४, दि.०३.०१.२०१७
५. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: सावावि-२०१६ / प्र.क्र.१६६/ फ-११,दि. ०४.०१.२०१७.

## शासन परिपत्रक :-

१. जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतू बदल याची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड हाती घेण्याचे महत्त्व वैश्विक स्तरावर मान्य झालेले आहे. ह्या उपक्रमाचा भाग म्हणून संदर्भ क्र. १ येथे नमूद शासन निर्णयान्वये दि. १ जुलै, २०१६ रोजी एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवड करण्याचा महत्वाकांक्षी आणि धडक कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. यामध्ये आदिवासी विकास विभागासह इतर शासकीय विभाग समाविष्ट झाले आहेत. त्यानुषंगाने आदिवासी विकास विभागांतर्गत क्षेत्रिय यंत्रणांनी करावयाची कार्यवाहीबाबत सविस्तर सूचना संदर्भ क्र. २ व ४ येथे नमूद शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.
२. सन २०१८ मधील नियोजित १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत नियोजन आणि पूर्वतयारीबाबत दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी सचिव ( वने ) यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्रशासकीय विभागांच्या समन्वय अधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. प्रस्तुत बैठकीमध्ये झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना प्रस्तूत करण्यात येत आहेत.
(i) महसूल व वन विभागाच्या संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयामधील तरतूदीनुसार प्रत्येक विभागास दिलेले उदिष्ट, लॅण्ड बँक, समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक, जिल्हयाचा सुक्ष्म आराखडा तयार करणे, वृक्ष लागवडीसाठी खड्डे तयार करणे, प्रत्यक्ष लागवड इ. माहिती तयार करुन ती जिल्हाधिकारी यांना कळविण्यात यावी.
(ii) महसूल व वन विभागाच्या संदर्भ क्र. १ व संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र क्र. २ मध्ये विहीत केल्यानुसार, वृक्ष जिवंत राहण्याच्या प्रमाणाबाबतची माहिती दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ पर्यंत सचिव ( वने) महसूल व वन विभाग आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक ( वनबल प्रमुख ), नागपूर यांना सादर करण्याची दक्षता घ्यावी.
(iii) महसूल व वन विभागाच्या संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र क्र. १ आणि विवरणपत्र क्र. २ मध्ये सन २०१८ मधील प्रस्तावित वृक्ष लागवडीबाबतची माहिती अचूकपणे भरावी.
(iv) वृक्ष लागवड आणि पर्यावरण संरक्षण यासाठी दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत किमान १ कोटी स्वयंसेवकांची मोठी सेना तयार करण्याचे उदिष्ट संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेले आहे. त्यानुसार सर्व अधिकारी /

कर्मचारी यांना सदस्य नोंदणीबाबत उद्युक्त आणि प्रोत्साहित करावे. त्याचबरोबर हरित सेनेमध्ये स्वयंसेवक म्हणून नोंद करण्याबाबत देखील सूचना द्याव्यात.

(v) क्षेत्रीय स्तरावरील तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरीय बैठकांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन या संदर्भातील विषय प्रत्येक बैठकांच्या वेळी विषयसूचीमध्ये स्थायी विषय म्हणून अंतर्भूत करण्यात यावा. अशा बैठकांमध्ये वृक्ष लागवडीचा आढावा, या पूर्वी लावलेल्या झाडांचे जिवंत राहण्याचे प्रमाण, मृत झाडांच्या जागी नवीन झाडांची लागवड, पुढील वर्षांमध्ये वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टाप्रमाणे वृक्षारोपणासाठी स्थळ निश्चिती, रोपांची उपलब्धता, आवश्यक त्या तांत्रिक परिमाणाप्रमाणे विहित कालावधीमध्ये पिटस् तयार करणे, निधीची उपलब्धता इत्यादी संदर्भात पूर्व तयारीबाबत आढावा घेण्यात यावा .

(iv) तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावरील जे अधिकारी क्षेत्रीय कामांना भेटी देतील, त्यावेळी वृक्ष लागवडीच्या स्थळांना आवर्जून भेटी देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा, अशा क्षेत्रीय भेटीच्या वेळी लावलेल्या झाडांचे संरक्षण योग्य रितीने होते किंवा नाही, मृत झाडांच्या बदल्यात नवीन झाडे लावली गेली किंवा नाही, पाण्याची व्यवस्था आणि संरक्षणासाठी मनुष्यबळ इत्यादी बाबींची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करावी. त्याचप्रमाणे येणाऱ्या अडचणी सोडविण्याबाबत उपाययोजना कराव्यात .

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७११२७१६४०४७६२२४ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2017.11.27 16:43:38 +05'30'

**( सु. ना. शिंदे )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रायल,मुंबई.
३. मा.मंत्री,(वने),यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
५. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव , मंत्रालय,मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. मा.सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. मा.प्रधान सचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
९. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
१०. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
११. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक .
१२. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ,नाशिक
१३. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती.
१४. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१५. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्या.अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती.(का.१४) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.